ISSN 2277 - 5730
AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY
QUARTERLY RESEARCH JOURNAL

# AJANTA

Volume - IX Issue - II Marathi April - June - 2019

## Peer Reviewed Referred and UGC Listed Journal

Journal No. 40776

ज्ञान-विज्ञान विमुक्तये

IMPACT FACTOR / INDEXING
2018 - 5.5
www.sjifactor.com

❖ EDITOR ❖
Asst. Prof. Vinay Shankarrao Hatole
M.Sc (Maths), M.B.A. (Mktg.), M.B.A. (H.R.),
M.Drama (Acting), M.Drama (Prod. & Dir.), M.Ed.

❖ PUBLISHED BY ❖

Ajanta Prakashan
Aurangabad. (M.S.)

PRINCIPAL
Adarsh Arts & Commerce College,
Desaiganj (Wadsa) Dist.- Gadchiroli

# CONTENTS OF MARATHI



| अ.क्र. | लेख आणि लेखकाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १२ | संत चोखामेळाची अभंगवाणी<br>**प्रा. प्रवीण घारपुरे** | ५४-५९ |
| १३ | नोटबंदीचा भारतीय अर्थव्यवस्थेवर परिणाम<br>**प्रा. निहार अशोक बोदेले** | ६०-६५ |
| १४ | 'कालिदास रचित 'रघुवंश' महाकाव्य में काव्य शास्त्रीय तत्व'<br>**नारणभाई मूलजीभाई दुबरिया** | ६६-७० |
| १५ | महिला सरपंचाच्या कार्यशैलीचा अभ्यास संदर्भ क्षेत्र : वर्धा जिल्ह्यातील हिंगणघाट तालुका<br>**प्रा. डॉ. अरुण शेंडे** | ७१-७९ |
| १६ | आदिवासींच्या जीवनावर सामुदायिक विकास योजनेचा झालेला परिणाम<br>**प्रा. उत्तम एन. शेंडे** | ८०-८६ |
| १७ | सकारात्मक मानसशास्त्राची उदिष्ट्ये व गृहितक संकल्पनांचा एक संक्षिप्त आढावा<br>**प्रा. डॉ. एन. एस. डोंगरे** | ८७-९४ |
| १८ | डॉ. बाबासाहेब आंबेडकराचे शैक्षणिक विचार<br>**प्रा. डॉ. नंदकिशोर लक्ष्मणराव अरुळकर** | ९५-९७ |



Adarsh Arts & Commerce College Desaiganj

PRINCIPAL
Adarsh Arts & Commerce College,
Desaiganj (Wadsa) Dist.- Gadchiroli

VOLUME - IX, ISSUE - II - APRIL - JUNE - 2019
AJANTA - ISSN 2277 - 5730 - IMPACT FACTOR - 5.5 (www.sjifactor.com)

# १३. नोटबंदीचा भारतीय अर्थव्यवस्थेवर परिणाम

प्रा. निहार अशोक बोदेले
सहाय्यक प्राध्यापक, अर्थशास्त्र विभाग, आदर्श कला व वाणिज्य महाविद्यालय, देसाईगंज (वडसा) जि. गडचिरोली.

**प्रास्ताविक**

भारतीय अर्थव्यवस्थेला विकासाच्या रथावर आरूढ करण्यासाठी व जनतेला 'अच्छे दिन' दाखविण्यासाठी भारत सरकारने 2016 च्या नोव्हेंबर महिन्यातील 8 व्या दिवशी अचानक चलनातील 500 व 1000च्या नोटा चलनातून बाद करण्याचा निर्णय घेत. व रात्रीच्या 12.00 वा पासुन या नोटा कायदेशीरपणे बंद करण्यात आल्या. भारताच्या एकुण चलनापैकी 86 टक्के चलन (15.44 लाख करोड रूपये) 500 व 1000 च्या स्वरूपात होते जे चलनातून बंद करण्यात आले. नोटाबंदीच्या निणर्याच्या समर्थनात देशातील काळा पैसा बाहेर येईल, आतंकवादी व नक्षल कार्यवाया थंड पडतील व त्यांची कंबर मोडली जाईल, भाववाढ कमी होईल, नक्कली नोटा अर्थव्यवस्थेच्या बाहेर पडून अर्थव्यवस्थेचे संरक्षण होईल इ. मत व्यक्त केले जात होते. अर्थव्यवस्थेच्या विकासाठी आवश्यक व मुलभुत स्वरूपाचे बदल करण्यासाठी सरकारणे योग्य वेळी आर्थिक सुधारणेचे निर्णय घेÅन करून विकासाला गती प्रदान करणे आवश्यक असते. याच दृष्टीकोनातून नव्याने आलेल्या सरकारने नोटबंदीच्या स्वरूपात आर्थिक सुधारणेचे निर्णय घेतले परंतू नोटबंदीच्या निर्णयावर अनेकांनी तज्ञांनी आक्षेप घेतला विषेशतः हे निर्णय ज्या घाईने घेण्यात आले व निणर्याच्या अंमलबजावनीतील ज्या उनिवा दिसू लागल्या त्यामूळे नोटबंदीच्या निणर्याचे सार्थक परिणाम अर्थव्यवस्थेत दिसले नाही म्हणूनच नोटबंदीचे नेमके फलीत काय? असा प्रश्न उभा राहतो.

भारतीय अर्थव्यवस्था व तिच्या विकासाच्या परीप्रेक्षातून नोटबंदीच्या निर्णयाचे अर्थव्यवस्थेच्या विभिन्न क्षेत्रावरील प्रभावाचे विश्लेशण करणे आवश्यक आहे. नोटबंदीच्या निर्णयाला दोन वर्ष झाले असतांना अर्थव्यवस्थेवर या निर्णयाचे विश्लेशन करणे व अर्थव्यवस्थेवरील परिणामांची चर्चा करण्या च्या उददेशाने हे संषोधन लेख लिहण्यात आले.

**सरकारची नोटबंदीची घोषणा व अंमलबजावणी**

प्रधानमंत्री मा. नरेंद्र मोदी यांनी 8 नोव्हें 2016 ला रात्री 8.00 वा 500 रू व 1000 रू च्या नोटाबंदी ची घोषणा करून रात्री 12.00 वा. पासून हा निर्णय अंमलात येण्याचे जाहीर केले. त्यामूळे 8 नोंव्हे च्या मध्यरात्री पासून 500 व 1000 रूप्याच्या नोटा कायदेशीर चलन राहीले नाही. परंतू पेट्रोल पंप, दवाखाने, रेल्वे, विमान प्रवास इ. क्षेत्र या निर्णयापासून वगळण्यात आले. या क्षेत्रात जून्या नोटा स्विकारण्याची 10 नोव्हं पर्यंत. व नंतर त्यात वाढ करून 14 नोव्हें व 15 नोव्हें पर्यंत मूभा देण्यात आली. सामान्य जनतेला आपल्या जवळील जून्या 500 व 1000 रूपायाच्या नोटा 30 डिसें 2016 पर्यंत बॅकेत बदलविण्याची वेळ देण्यात आली. या व्यतिरिक्त बॅकेतील व्यवहारावर सुध्दा काही निर्बंध घालण्यात आले. त्यात बॅकेच्या खात्यातून दिवसाला 10,000 रू आणि आठवडयाला 20,000 रू काढण्याची कमाल मर्यादा घालण्यात आली. 14 नोव्हें 2016 ही मर्यादा वाढवून आठवडयाला 24,000रू करण्यात आली. ATM मधून



Adarsh Arts & Commerce College Desaiganj
PRINCIPAL
Adarsh Arts & Commerce College,
Desaiganj (Wadsa) Dist.- Gadchiroli
133

पैसे काढण्याची मर्यादा दिवसाला 2000 रू करण्यात आली. हि मर्यादा वाढवून 2500 रू करण्यात आली. लग्न असणाऱ्या परिवाराला व शेतकऱ्यांना पिक कर्जा साठी हप्त्याला 25000 रू काढण्याची मुभा देण्यात आली.

सरकारचे निमौद्रिकरणाच्या प्रकियेत वारवांर निर्णय ब्रदल्याचे दिसून येते. त्यामूळे सरकारचे नेमके यासंदर्भात धोरणे काय आहे? या बाबत लोकांच्या मनात संभ्रमाची स्थिती निर्माण झाली होती.

**नोटबंदीचे उद्देश**

सरकारने नोटबंदीचे जे निर्णय घेतले त्याचे मुख्य उद्देश प्रधानमंत्री मा. नरेद्र मोदी यांनी नोटबंदीच्या वेळी केलेल्या भाषणातून व्यक्त होतात.

- आंतकवाद व नक्षलवाद या सारख्या राष्ट्रविघातक कृत्यांसाठी पूरविण्यात येणारा निधी थांबेल व आंतकी व नक्षली कार्यवाया बंद होतील.
- कायदेशीररित्या कर न भरता ज्यांनी काळा पैसा जमा केला आहे, तो नोटबंदीमूळे बाहेर येईल व काळया पैश्याला व भष्ट्राचराला आळा घालता येईल.
- देशाच्या अर्थव्यवस्थेत चलनात असणारे नकली नोट जे मुख्यतः मोठया नोटांच्या स्वरूपात असतात त्यांचे अस्तित्व संपविता येईल व अर्थव्यवस्थेचे संरक्षण होईल.
- अर्थव्यवस्थेला कॅशलेस करणे अर्थात अधिकाधिक व्यवहार हे डिजीटल माध्यमाने करण्यास प्रोत्साहीत करणे सोपे होईल.
- डिजीटलकरणाला प्रोत्साहीत करणे.

**निमौद्रिकरणाचा भारतीय अर्थव्यवस्थेवरील परिणामाचे विष्लेशण**

सरकारने नोटबंदी निर्णयाच्या समर्थनात अनेक बाबी स्पष्ट केल्या असल्या तरी नोटबंदीच्या निर्णयाचे भारतीय अर्थव्यवस्थेच्या विभिन्न क्षेत्रावर परिणाम झालेचे दिसून येते. नोटबंदीला दोन वर्षा पूर्ण झाले असतांना, नोटबंदीचा अर्थव्यवस्थेच्या विभिन्न क्षेत्रावर काय परिणाम झाले? नोटबंदीची उद्देशपूर्ती झाली का? हे प्रश्न कायम आहेत. म्हणूनच नोटबंदी निर्णयाच्या उद्देशानूरूप विश्लेषणावरून नोटबंदीचे अर्थव्यवस्थेवरील परिणाम स्पष्ट करता येतील.

**नोटबंदीचा आर्थिक वृध्दी GDP वर परिणाम**

अर्थव्यवस्थेचा आर्थिक विकास अनेक घटकावर अवलंबून असतो. आर्थिक विकासा मापनाचे महत्वाचे निर्देशक GDP आहे. सकल घरगुती उत्पादन यामध्ये विविध क्षेत्रातील उत्पादनाची गणना केली जाते. नोटबंदीचा वेगवेगळया क्षेत्राच्या उत्पाकतेवर परिणाम स्पष्ट दिसून येतो. नोटबंदीमूळे अनेक क्षेत्रातील उत्पादन घटले व पर्यायाने GDP सुध्दा घटले. 2017–18 आर्थिक वर्षात सरकारणे जाहीर केलेल्या वेगवेगळया अहवाला वरून नोटबंदीमूळे देशाचा आर्थिक विकासाचा दर घटल्याचे लक्षात येते. 2017–18 आर्थिक वर्षात पहिल्या, दुसऱ्या, तिसऱ्या व चौथ्या त्रैमासिक अहवालात विकास दर (GDP) अनुकमे 7.9:, 7.5:, 7: 6.1:, व 5.7: पर्यत खाली आला. GDP दर 2 टक्यांनी खाली येण्याचे संकेत अर्थशास्त्री व माजी प्रधानमंत्री डॉ. मनमोहन सिंग यांनी आधीच दिले होते. परंतू सरकार कडून



PRINCIPAL
Adarsh Arts & Commerce College,
Desaiganj (Wadsa) Dist.- Gadchiroli
Adarsh Arts & Commerce College Desaiganj

त्याच्यावर टिका करण्यात येत होती. सरतेषेवटी त्यांचे भाकित खरे ठरतांना दिसते. GDP मध्ये घट होण्याच्या कारणाचे विश्लेषण केल्यास आपल्याला दिसते की, भारतीय अर्थव्यवस्थेत उत्पादकता मुख्यतः संघटीत व असंघटीत क्षेत्रावर अवलंबून आहे. संघटीत क्षेत्राचा वाटा जिथे 15 ते 20% आहेत तर असंघटीत क्षेत्राचा वाटा 80 ते 85 % आहे. नोटबंदीच्या निर्णयाचा परिणाम सर्वाधिक असंघटीत क्षेत्रावर झाला कारण असंघटीत क्षेत्रातील व्यवहार मुख्यतः रोखीने होतात. परिणामास्तव नोटबंदीमुळे पैशाच्या अभावी असंघटीत क्षेत्रातील उत्पादन घटले. असंघटीत क्षेत्रातील अनेक उद्योग बंद पडले तर काही उद्योगाच्या उत्पादकतेत घट झाली. विशेषतः लहान व सुक्ष्म उद्योगावर नोटबंदीचा नकारत्क प्रभाव दिसून येतो. या उद्योगांना आपल्यां गरजा पूर्ण करण्यासाठी पूरेशी रोख प्राप्त होवू शकली नाही. या क्षेत्रातील मागणी कमी होऊन उत्पादनात घट झाली व GDP दर घटले. सरकारणे नोटबंदीचा निर्णय घेतांना असंघटीत क्षेत्रातील या बाबीचा विचार न करता व पूर्व तयारी न करता निर्णय घेतला असे जानवते.

**नोटबंदीचा काळया पैशावरील परिणम**

सरकारणे नोटबंदीचे महत्व पटवून देतांना नोटबंदीच्या निणर्यामूळे देशातील काळयां पैशाच्या स्वरूपात असणाऱ्या अर्थव्यवस्थेवर आघात होऊन लोकांनी आतापर्यंत मिळविलेला काळा पैसा बाहेर येईल व काळयापैश्यापासून अर्थव्यवस्थेचे संरक्षण होईले असे सांगितले जात होते. परंतू वास्तविकतेमध्ये नोटबंदीमूळे कुठलाही काळा पैसा बाहेर आला नाही. याही उध्दिष्टात सरकार अपयशी ठरले. आपल्याला हे समझून घ्यावे लागेल की, लोकांनी कायदेशीररित्या कर न भरता जमा केलेल्या पैश्याला काळा पैसा समझण्यात येतो. ज्यांच्याकडे काळा पैसा आहे त्यांनी हा पैसा नोटाच्या किंवा नगदीच्या स्वरूपात स्वतःकडे ठेवले असते तर कदाचित नोटबंदीचा लाभ झाला आसता परंतू असा काळा पैसा लोक स्वतःकडे न ठेवता त्यांची गुंतवणूक जमीन, घर, सोना, विदेशी बॅकेच्या ठेवी मध्ये करतात. केवळ 6% नगद स्वरूपात व 96% इतर ठिकाणी गुंतवणू करतात. त्यामुळे नोटबंदीमूळे काळा पैसा बाहेर येईल ही अवास्तविक बाब आहे. काळयापैशावर नोटबंदी हे रामबाण उपाय असू शकत नाही. नोटबंदीच्या निर्णयानंतर सरकारने किती काळा पैसा बाहेर आला याचे अंदाज सरकारणे जाहीर केले नाही. रिजर्व बॅकेच्या अहवाला नूसार नोटाबंदीमूळे 15.44 लाख करोड रू मूल्याच्या नोटा बंद झाल्या व त्यापैकी 15.28 लाख करोड रू बॅकेत परत जमा झाले म्हणजे जेवढया मूल्यांचे नोट बंद झाले त्यापैकी 99% पैसा बॅकेत परत आला. केवळ 1% पैसा परत आला नाही. या 1 टक्यात 3300 करोड रू नेपाल व भूतान मध्ये असल्याचे व उरलेले काही मंदीराकडे, ग्रामिण भागातील लोकांकडे व विदेशी भारतीय निवासी यांच्या कडे आहे जे वेळेच्या आत नोट बदलवू शकले नाही. त्यामूळे काळा पैसा बाहेर काढण्याचे जे उद्देश सांगितल्या जात होते ते पूर्ण होऊ शकले नाही व सरकारची नोटबंदी ही पूर्णतः फसली अस म्हणावे लागेल.

**आतंकवादी व नक्षली निधीच्या बाबतीतिल वास्तविकता**

नोटबंदीमूळे आंतकवादी व नक्षल कार्यवाया यावर नियंत्रण करता येईल, नोटबंदीमूळे आतंकवादी व नक्षली कार्यावायासाठी पूरविला जाणारा पैश्याचा पुरवठा बंद होईल या सारखे कारणे सांगूण सरकारणे सामान्याकडून नोटबंदीला समर्थन प्राप्त करण्याचा प्रयत्न केला. परंतू अभ्यासावरून निदर्शनात येते की, 8 नोव्हें च्या नोटबंदी नंतरही 19 नोव्हें ला आसामच्या टिनसाकीयातील सेनेच्या कॅाप वर हल्ला झाला. त्यानंतर 22 नोव्हें. ला काश्मीर मध्ये



Adarsh Arts & Commerce College Desaiganj
PRINCIPAL
Adarsh Arts & Commerce College,
Desaiganj (Wadsa) Dist.- Gadchiroli

आतंकवादी हल्ल झाला. त्यानंतर 29 नोव्हें ला नागरोटा येथे आतंकवादी हल्ला झाला. 24 एप्रिल 2017 ला सुकमा छतीसगढ येथे नक्षली हल्ला झाला. 11 जुलै 2017 ला अमरनाथ यात्रींवर हल्ला झाला. व अलीकेडे झालेला 14 फेब्रुवारी 1019 ला पूलवामा हल्ला झाला त्यामूळे नोटबंदी मूळे आंतकवादी व नक्षलवादी यांची कमर मोडली जाईल हे भाकित सुध्दा खोटे ठरले. आतंकवादी कार्यवायासाठी जो निधी पूरविला जातो त्याचे अंदाज जवळ जवळ 400 करोडचे आहे. म्हणजे एकूण नोटबंदीच्या 0.22:, इतकया साठी 15.44 लाख करोड नोटबंदी करणे हे वास्तविकता धरून निश्चितच नाही. आंतकवादी कार्यवाया थांबविण्यासाठी इतर मार्गाचा अवलंब निश्चितच करता आला असता. यावरून नोटबंदीचा निर्णय विवेकहीन असल्याचे स्पष्ट होते.

**रोजगारावर परिणाम**

भारतातील मध्यम व लघू उद्योगातील रोजगारावर नोटबंदीचा परिणाम 1 महीण्यातच दिसून आला. All India Manufacturers Organization (AIMO) नुसार निर्माणी क्षेत्रातील 35% रोजगार कमी झाले व त्यांची प्राप्ती 50% नी कमी झाली. तसेच Center for Monitoring Indian Economy (CMIE) च्या नुसार जानेवारी ते एप्रिल 2017 च्या दरम्यान 15 लाख श्रमीक बेरोजगार झाले.

भारतातील असघटीत क्षेत्र सर्वाधिक रोजगार उपलब्ध करून देणारे क्षेत्र आहे. हे क्षेत्र नोटबंदी मूळे मोठया प्रमाणात प्रभानित झाले. भारताच्या ग्रामिण भागात 75% रोजगार असंघटीत क्षेत्रातून प्राप्त करतात त्यातही 41% हे बिगर शेती असंघटीत क्षेत्रातून प्राप्त होतो तर शहरी भागात तेच प्रमाण 69% आहे. असंघटीत क्षेत्रात एकूण 91 % रोजगार प्राप्त होतो. या क्षेत्रात मूख्यातः खाजगी निर्माण क्षेत्र, बांधकाम क्षेत्र, व्यापार (किरकोळ व घाऊक) यांचा समावेश होतो. या क्षेत्रातील श्रमिकांवर नोटबंदी मूळे बेरोजगार होण्याची वेळ आली. या क्षेत्राला बेराजगारीचा मोठा फटका बसला आहे. Financial Express ( Nov. 24, 2016) नुसार संघटीत क्षेत्रातील 4 लाख श्रमिक नोटबंदीच्या निर्णयाने प्रभावीत झाले. भारतातील असंघटीत क्षेत्र जिथे कामगाराची नोंद नसते व मजूरी दिवसाला दिली जाते तिथे नगदीच्या अभावी त्यांना रोजगार प्राप्त झाले नाही. अनेक श्रमिकांनी रोजगाराच्या अभावी आपल्या गावाकडे पलायन केले. निश्चितच नोटबंदीने अंसघटीत क्षेत्रातील रोजगार कमी केले आहे हे मान्य करावे लागेल.

**रोकड विरहीत व्यवहार**

नोटबंदी निर्णयाचे विपरीत परिणाम अर्थव्यवस्थेवर होत असल्याचे जाणवू लागले व नोटबंदीचे निर्धारित उद्देश प्राप्त होÅ शकले नाही हे लक्षात येताच सरकार नोटबंदीचे नवनविन कारणे मांडू लागली त्यातलाच एक कारण सरकारने सांगितले ते म्हणजे अर्थव्यवस्थेला रोकडविरहीत व्यवहाराकडे परिवर्तीत करणे. परंतू भारतीय अर्थव्यवस्थेतील ग्रामिण भागात जिथे बॅकींग सेवांचा फारसा प्रसार झाला नाही. इंटरनेट सुविधा जिथे बरोबर चालत नाही व ऑनलाईन सुशिक्षितपणा अगदी नगण्य आहे. तिथे रोकडविरहीत व्यवहाराची लोकांना सवय लावणे व रोकडविरहीत व्यवहाराचे आग्रह धरणे म्हणजे लंगडया व्यक्तीला पहाड सर करायला लावण्यासारखेच आहे. भारताच्या संदर्भात रोकडविरहीत व्यवहाराला प्रोत्साहीत करण्यासाठी ग्रामिण भागात बॅकींग व्यवस्था निर्माण करणे व लोकांना रोकडविरहीत व्यवहारा बाबत शिक्षित करणे गरजेचे आहे. वितिय व्यवहाराची आधारसंरचना निर्मान न करता लोकांना रोकड विरहीत व्यवहारासाठी प्रेरित केले जाऊ शकत नाही.



PRINCIPAL
Adarsh Arts & Commerce College,
Desaiganj (Wadsa), Dist.- Gadchiroli
Adarsh Arts & Commerce College Desaiganj

रोकड विरहीत व्यवहाराचा जिथे आग्रह धरला जातो तिथे काही बाबी विचारत घेणे आवश्यक आहेत त्या म्हणजे ऑनलाईन व्यवहारामूळे एखादयाचा वैयक्तीक वित्तीय व व्यवहार सर्वांना माहित होते व त्यात खाजगी काही राहत नाही, परिणामास्तव सायबर गुन्हे वाढत जातात. सायबर गुन्हयापासून संरक्षणासाठी सरकारकडे कोणतीही विशेष यंत्रणा नाही. सायबर गुन्हे घडत असतांना व त्या संदर्भात बचाव यंत्रणा कमकूवत असतांना रोकड विरहीत व्यवहार आग्रह धरणे हे नागरिकांच्या हिताचे नाही. तसेच रोकड विरहीत व्यवहार करतांना ग्राहकांना ज्या माध्यमाचा उपयोग करावा लागतो त्यासाठी त्यांना काही कमीशन द्यावे लागते हे एक प्रकारे ग्राहकांचे शोषण आहे. मग प्रश्न उपस्थित होतो की जर भारतासारख्या देशात जिथे जनता रोखीने सहज व्यवहार कुठलाही कमीशन न देता करू शकतात. अशा स्थितीत त्यांना एकाएक ऑनलाईन व्यवहार करण्याचा आग्रह धरणे हे योग्य धोरण नव्हे. ऑनलाईन व्यवहार हे वैकल्पीक असले पाहीजे त्याचा वापर बंधनकारक असू नये.

**कृषी क्षेत्रावरील परिणाम**

नोटबंदीच्या काळात शेतकऱ्यांची फारच दैनिय अवस्था झाल्याचे दिसून येते कारण त्यांची बचत करण्याची व रोखीने व्यवहार करण्याची सवय यामूळे शेतकऱ्यांना आपल्या शेती विषयक व कौटूंबिक गरजा पूर्ण करण्यात तारेवरची कसरतच करावी लागली. शेतकऱ्यांच्या दृष्टीने पाहता नोटबंदीचा निर्णय अयोग्य वेळी करण्यात आला यात दुमत नाही. शेतकऱ्यांच्या हातात शेतीसंबंधी आदानाची खरेदी करण्यासाठी पूरेशी रोख रक्कम उपलब्ध नव्हती. त्यामुळे शेतीचा हंगाम पूढे गेला योग्य वेली त्यांना आदाने खरेदी करता आले नाही. भारतातील जवळजवळ 263 लक्ष शेतकरी मुख्यतः रोख अर्थव्यवस्थेत अंतभूत होतात. अशास्थितीत शेतकऱ्यांना नोटबंदीचा मोठाच फटका बसला. ८

**नकली नोटा**

नोटबंदी मूळे नकली नोटा अर्थव्यवस्थेतून बाहेर काढण्यास मदत होईल. सरकारचे हे दिलेले स्पष्टीकरणही फसवे म्हणावे लागेल कारण भारतीय रिजर्व बॅंके च्या अहवाला नूसार नोटबंदीच्या काळात केवळ 11.23 करोड रू चे नकली चलन प्राप्त झाले. या वरून असे म्हणवे लागेल की, सरकारणे 11.23 करोड रूपयासाठी 15.44 लाख करोड मूल्याचे नोटा बंद केल्या.

एकंदरीत पाहता नोटबंदीचा निर्णय ज्या अपेक्षेने घेण्यात आला त्या अपेक्षा पूर्ण होवू शकत्या नाहीत हे स्पष्टच होते.

**निश्कर्श**

देशाच्या आर्थिक विकासासाठी अर्थव्यवस्थेच्या आवश्यकते नुसार आर्थिक सुधारणा अगत्याचे असते त्यामूळे आर्थिक विकसातील अळथडे दुर होतात तसेच करण्यात आलेल्या सुधारणेचे निर्णय व अंमलबजावणी अर्थव्यवस्थेच्या आवश्यकतेनुसार होत असेल तर त्या सुधारामूळे अर्थव्यवस्था लाभाविंत होते असते. देशातील नोटबंदीचा निर्णय हा आर्थिक सुधारणा करण्यापेक्षा केवळ प्रयोगाची चाचपणी म्हणून केले गेले की काय? असे वाटते. नोटबंदीचे उद्‌देश हे निश्चितच चांगला होता. परंतू सरकारणे ज्या प्रकारे हे निर्णय घेतले व त्याची अंमलबजावणी केली त्यावरून यात सरकारच्या पूर्व तयारीचा अभाव दिसून येतो. नोटबंदीमूळे उद्भवणाऱ्या परिणामाचा विचार न करताच सरकारणे हा निर्णय घाई घाईने घेतल्याचे स्पष्टपणे दिसून येते. अर्थव्यवस्थेच्या पूर्व अभ्यासाशिवाय व वास्तविक स्थितीचा विचार न करता सरकारने नोटबंदीचा निर्णय घेतला ज्याचे वाईट परिणाम अर्थव्यवस्थेच्या विविभि क्षेत्रावर दिसून येतात. मूळात,



Adarsh Arts & Commerce College Desaiganj
PRINCIPAL
Adarsh Arts & Commerce College,
Desaiganj (Wadsa) Dist.- Gadchiroli

135

ज्या उद्देशने हा निर्णय घेण्यात आला त्या अनेक उद्देशापैकी एकही उद्देश पूर्ण करता आले नाही. मुख्य प्रश्न आहे की नोटबंदी यशस्वी झाली काय? तर निश्चितच याचे उत्तर नाही हेच आहे.

**संदर्भ**

1. uthulakshmi, E.K. (2017). Impacts of Demonetisation on Indian Economy- Issues & Challengcs. Journal of Humanities and Social Science.
2. http://marketrcalist.com
3. https://www.indianeconomy.net/splclassroom/
4. http://www.businessdictionary.com/def inition/demonetization.html
5. https://www.indiatoday.in/india/story/demonetisation-what-india-gained-and-lost
6. Ban on Rs 500, Rs 1000 Notes Is Surgical Strike on Terror Funding, Black Money. 9, Nov. 2016, http://timesofindia.indiatimes.com/home-page-sections/Black-Out-Rs-500-and-Rs-1000-notes-no-longervalid/articleshow/55321177.cms. Accessed 19 Jan. 2017.
7. MarketSlant. Modi's Demonetization Is a Cure Worse Than the Disease. MarketSlant,12Feb.2016,https://www.marketslant.com/articles/modi%E2%80%99s-demonetization-cure-worse-disease-2. Accessed 19 Jan. 2017.

PRINCIPAL
Adarsh Arts & Commerce College,
Desaiganj (Wadsa) Dist.- Gadchiroli